# जनसंपर्क अधिकारी
## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२- २९४५१००१
Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्र. ४५-२२ दिनांक १०/०२/२०२२

## "गुन्हे प्रकटीकरण कक्ष- १ यांचेकडून लाखो रुपयाचा गुटखा जप्त"

गुन्हे प्रकटीकरण कक्ष-१ काशिमीरा यांना मिळालेल्या माहितीवरुन दिनांक ०७/०२/२०२२ रोजी १६.५० रोजी काशिमीरा नाका, शेल पेट्रोलपंपा जवळ १) प्रणय सुर्वे, वय २७ वर्षे, रा. केतकी पाडा, दहिसर पुर्व, मुंबई, २) मेहबुब जमादार, वय ३४ वर्षे, रा. केतकी पाडा, दहिसर पुर्व यांना ताब्यात घेतले असता, त्यांचे ताब्यातील प्रवासी रिक्षा क्रंमांक एम-एच-४७/ए.जे.-१३९६ मध्ये महाराष्ट्र राज्य शासनाने प्रतिबंधीत केलेला १,९७,०४८/- रूपये किंमतीचा गुटखा व रोख रक्कम १,६०,०००/- रुपये जवळ बाळगले असताना मिळून आले. त्यांचेकडे केलेल्या अधिक तपासात इसम नामे मेहबुब जमादार याने त्याचा साथीदार एहसान शेख याचेशी संगणमत करून एहसान शेख याने भाडेतत्वावर घेतलेल्या रुममध्ये एकुण ११,३८,१६८/-रूपये किंमतीच्या गुटख्याचा साठा केले असल्याचे मिळून आला असून,असा एकुण १३,३५,२१६/-रु. किंमतीचा गुटखा जवळ बाळगला असल्याने त्यांचे विरुद्ध काशिमीरा पोलीस ठाणे गु.रजि.नं. ७५/२०२० भा.द.वि.स कलम ३२८, १८८, २७३, ३४ सह अन्न सुरक्षा मानके अधिनियम २००६ चे कलम २६(२), (४), ३०(२), (ए) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कारावाई सहा.पोलीस आयुक्त श्री.अमोल मांडवे (गुन्हे) मि.भा.व.वि.आयुक्तालय यांचे मागदर्शनाखाली पो.निरी. अविराज कुराडे, पो.उप.निरी. हितेंद्र विचारे, पुष्पराज सुर्वे, सहा.पो.उप.निरी. महादेव वेदपाठक, राजु तांबे, पो.हवा./संदिप शिंदे, किशोर वाडीले, अविनाश गर्जे, पो.ना./ संतोष लांडगे, पुष्पेंद्र थापा, सचिन सावंत, पो.शि./प्रशांत विसपुते यांनी पार पाडली आहे.